प्रेस नोट

स्थानिक गुन्हे शाखा,गडचिरोली दिनांक २२.०२.२०२०

| पो.स्टेशन/अप.क्र./कलम | घटनास्थळ/घटना ता.वेळ | फिर्यादी व आरोपीतांचे नाव |
|---|---|---|
| चामोर्शीअप. क्र. ८४/२०२०कलम ६५(ई),८३ महा. दारुबंदि अधि. . | मौजा भेंडाळा ते फोकुर्डी शेतशिवार १४ किमी पश्चिमपो.स्टे चामोर्शी **घटना ता. वेळ :-** दिनांक २१.०२.२०२० चे १५.४५ ते १६.३० वा.पर्यत | सरकार तर्फे :- पोउपनि भगवत उत्तमराव कदम नेम. स्थानिक गुन्हे शाखा पोलीस अधिक्षक कार्या. गडचिरोली **आरोपीतांचे नाव :-** **१. पंढरी चिरकुटा भोयर वय ४३ वर्षे, रा. भेंडाळा ता. चामोर्शी जिल्हा गडचिरोली** **पाहिजे आरोपी १. सोमेश्वर गोहणे २.प्रकाश तुमडे दोन्ही रा. फोकुर्डी ता. चामोर्शी जिल्हा गडचिरोली** |
| **माहिती कशी प्राप्त झाली** | **अवैध दारु रेड मधील सक्रिय अधिकारी/कर्मचारी** | |
| गोपनिय बातमीदारा कडुन मिळालेल्या माहिती वरुन | सफौ/७८७ दादाजी करकाडे, पोहवा/१४६१ नरेश सहारे पोहवा/१४९२ भाऊराव बोरकर, पोशि/३८१९ नुतेश धुर्वे, चापोना/३२३० मानीक निसार, चापोशि/२११३ सिध्दु बाबर | |

महाराष्ट्र शासनाने सन १९९२ पासुन गडचिरोली जिल्हा हा दारुबंदि जिल्हा म्हणुन घोषीत केला असतांना सुध्दा गडचिरोली जिल्हयातील काहि अवैध दारु विक्रेते हे शेजारील सिमावर्ती राज्यातील तसेच जिल्हयातील देशी/विदेशी दारु विक्री दुकाणातुन मोठया प्रमाणात दारुची खरेदी करुन चारचाकी तसेच दुचाकी वाहनाने आडमार्गाने बेकादेशिर वाहतुक करुन स्थानिक चिल्लर दारु विक्रेत्यांना घरपोच दारुचा पुरवठा करीत असल्याने स्थानिक चिल्लर दारु विक्रेते हे अवैध विक्री करीत असतात अशा प्रकारे होत असलेल्या अवैध दारु विक्रेत्यांवर अंकुश बसावा याकरीता मा. श्री. शैलेश बलकवडे, पोलीस अधिक्षक अधिक्षक गडचिरोली यांनी गडचिरोली जिल्हयातील अवैध दारु, जुगार व इतर अवैध व्यवयांवर रेड करुन प्रभावीपणे कायदेशिर कारवाई करण्याची जबाबदारी स्थानिक गुन्हे शाखेकडे सोपविली आहे.

पोलीस स्टेशन चामोर्शी अंतर्गत मौजा मार्कंडा (देव) येथे महाशिवरात्राचे पर्वावर मोठया प्रमाणात यात्रा भरत असल्याने यात्रे दरम्यान परीसरातील दारु विक्रेते अवैध दारु विक्री करण्याचे उद्देशाने शेजारील जिल्हयातुन बेकायदेशिर दारुची वाहतुक करुन यात्रे मध्ये अवैध दारु विक्री होण्याची शक्यता असल्याने यात्रे दरम्यान होणाऱ्या अवैध दारु विक्रीस आळा बसुन महाशिवरात्री निमीत्त आयोजीत असलेल्या यात्रे मध्ये कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होवु नये याकरीता स्थानिक गुन्हे शाखेकडील पथक हे अशा अवैध दारु विक्रीवर तसेच बेकायदेशिर वाहतुकीवर लक्ष ठेवुन होते. दिनांक २१.०२.२०२० रोजी स्थानिक गुन्हे शाखे चे पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी हे स्वत: त्यांचे अधिनस्थ पोलीस पथकासह मौजा मार्कडा परिसरात अवैध गस्तीवर असतांना अवैध दारु विक्री तसेच दारुचे बेकायदेशिर साठया संबधात गोपनिय सुत्रांकडुन मिळालेल्या माहितीचे आधारे पोलीस निरीक्षक उल्हास भुसारी हे सोबतचे पथकासह मौजा भेंडाळा येथील नमुद आरोपीचे राहाते घरी झडती घेवुन अवैध विक्री करीता बाळगलेला दारुचा माल जप्ती केला तसेच पाहिजे आरोपी सामेश्वर गोहणे रा. फोकुडी यांने मौजा फोकुर्डी शेतशिवारात लपवुन ठेवलेला दारुचा साठा जप्ती केला अशा प्रकारे देशी दारु सुपर सॉनीक रॉकेट संत्रा कपंनीचे एकुन ५५ सिलंबद बॉक्स प्रति बॉक्स १०० प्रमाणे एकुन ५५०० सिलबंद निपा एकुन४,४०,०००/- रुपये किमंतीचा मुदे्माल जप्त करण्यात आला असुन वरील प्रमाणे नमुद अटक व पाहिजे आरोपीता विरुध्द पोस्टे चामोर्शी येथे कायदेशिर कारवाई करण्यात आली.

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथका कडुन महाशिवरात्री चे पर्वावर आयोजीत असलेल्या यात्रे दरम्यान सदरचे परिसरात अवैध दारु रेड करुन मोठया प्रमाणात दारुचा साठा जप्ती केलेल्या यात्रे दरम्यान शांतता राहाण्यास हातभार लागला आहे.

